क्र.का.१६/संशोधन/प्र.क्र.१/११/५९४
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे
दिनांक - २०/०५/२०११.

**विषय :- मुद्रांक शुल्क चुकविणेवर नियंत्रण ठेवणेबाबत...**

# परिपत्रक

सन २००४ पासून, मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ चे परिशिष्ट-१ मधील बहुतांशी दस्तऐवजांना किमान मुद्रांक शुल्क रु.१०० करण्यात आले आहे. हे करत असतांना शासनाने सर्वसामान्यांना, शासकीय कार्यालयात सादर करणे भाग असलेल्या प्रतिज्ञापत्रांना जसे की, निवास दाखला, जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला ईत्यादिंपाठी भराव्या लागणा-या मुद्रांक शुल्कातून पुर्णतः सूट दिली आहे. ज्या दस्तऐवजांना रुपये शंभर पेक्षा कमी मुद्रांक शुल्क देय आहे, ते प्रचंड प्रमाणात होणाऱ्या उलाढालीचे म्हणजेच शेअर बाजार, वस्तुबाजार इत्यादि व पोचवणी आदेश अशा प्रकारचे दस्तऐवज आहेत. सर्वसाधारणपणे या प्रकारचे दस्तऐवजांचे प्रमाण हे मुंबई, पुणे, ठाणे, रायगड या ठिकाणी अधिक आहे. परंतू, असा अनुभव आहे की, वरील शहरांव्यतिरिक्त इतर शहरे, तालुके व ग्रामीण भागातून रुपये १० व रुपये २० चे मुद्रांकाची मागणी भरपूर प्रमाणात होत आहे. मध्यंतरी एका जिल्हयात भुतलक्षी तारखां दाखवून या मुद्रांकाचा गैरवापर झाल्याची तक्रारही दाखल झाली आहे. तसेच या प्रकारचे मुद्रांकावर तात्पुरते व्यवहार करुन घेवून, शासन महसूलाला बगल दिली जावू शकते.

तरी वरील सर्व बाबींचा विचार करुन, रुपये शंभरचे आतील दर्शनी मुल्यांचे मुद्रांकावर कडक नियंत्रण ठेवण्याची गरज निर्माण झाली आहे.

यास्तव सर्व जिल्हा निंबधक, मुद्रांक जिल्हाधिकारी, सहजिल्हा निबंधक, दुय्यम निबंधक यांना याद्वारे सुचित करण्यात येते की, त्यांनी आपले अधिपत्याखालील सर्व मुद्रांक विक्रेत्यांना पुढीलप्रमाणे सूचना द्याव्यात.-

१) मुद्रांक विक्रेत्याने मुद्रांक खरेदीसाठी आलेल्या प्रत्येकांस मुद्रांकाचा वापर कोणत्या दस्तऐवजासाठी केला जाणार आहे, याची प्रथम चौकशी करावी.

२) चौकशीमध्ये संबंधित दस्तऐवजाला रु.१०० पेक्षा अधिक मुद्रांक शुल्क देय आहे, असे आढळून आल्यास खरेदीदारांस याबाबतची कल्पना द्यावी व या कारणास्तव रुपये १०० पेक्षा कमी मुल्याचे मुद्रांक शुल्क देणे गैर असल्याचे नम्रपणे सांगून कमी मुल्याचे मुद्रांक देण्यास असमर्थता दर्शवावी.

३) यथास्थित वरिष्ठ अधिका-यांकडे हा वाद गेलाच, तर त्यांनी देखील संबंधितांना वस्तुस्थितीची जाणीव करुन द्यावी व त्यांनी त्यांचे म्हणणे न सोडल्यास, मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ चे कलम ३३ प्रमाणे कारवाईची जाणीव करुन द्यावी.

जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
शाखा:-
आवक नं.
दिनांक - 2 JUN 2011
विशेष नोंद वही नं.-
कार्य विवरण नं.-
प्र. लि. नि. उ. जि. जिल्हाधिकारी
दुळवहिवाट शाखा
टपाल प्राप्त झाल्याचा दिनांक :
संकलन :- दुळवहिवाट :-
कार्यविवरण क्रमांक :- 248
सही :-
14 JUN 2011

१२

४) उक्त सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी म्हणून विक्रेत्यांना आपले विक्री रजिस्टरमध्ये कुठलाही मुद्रांक कोणत्या दस्तऐवजासाठी विकला आहे, हे लिहिणे बंधनकारक करावे व वेळोवेळी रजिस्टरची तपासणी करुन, त्यावर योग्य नियंत्रण ठेवावे.

परंतु, जर एखाद्या दस्तऐवजाला रु.१०० पेक्षा अधिक, उदाहणार्थ रु.१२०/- चे मुद्रांक शुल्क देय होत असेल, तर रुपये १००/- चा एक नग व रुपये २०/- चा एक नग असे दोन नग मिळून रुपये १२० चे मुद्रांक देणेस हरकत नाही. तसेच संबंधित दस्तऐवजाला मुळातच रु.१००/- पेक्षा कमी मुद्रांक शुल्क देय असेल, अशा प्रकरणातही आवश्यक तेवढे मुद्रांक देणेस हरकत नाही. मात्र, मुद्रांक विक्रेत्यांनी रु.१००/- च्या दर्शनी किंमतीच्या आतील सुटया मुद्रांकाची विक्री केल्यास, त्या मुद्रांकाचा वापर मुंबई मुद्रांक अधिनियमाच्या अनुच्छेदातील कोणत्या दस्तऐवजासाठी केला जाणार आहे, हे मुद्रांकांवर लिहिणे बंधनकारक करावे.

तरी यापुढे फसवा-फसवी सारखे गैरप्रकार टाळावेत आणि शासन महसूलाचे नुकसान होवू नये म्हणून याची तंतोतंत अंमलबजावणी होईल, असे पहावे. याकरिता अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई व सर्व सहजिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी त्यांचे अधिपत्याखालील सर्व मुद्रांक विक्रेत्यांना, या परिपत्रकातील सूचनांची त्वरीत काटेकोरपणे पालन करणेबाबतच्या सूचना देण्यात याव्यात.

का.प्र.मा.नोंमनि यांचे सहीची असे.

सह नोंदणी महानिरीक्षक तथा
मुद्रांक अधिक्षक, म.रा., पुणे.

प्रत-
१) अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई
२) सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा निबंधक
३) सर्व विभागीय नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,
४) सर्व सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी

क्र. कुवशा/७/काबि-२२२८२/११
जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
दिनांक - 1 ८/२०११

प्रति,
तहसीलदार सर्व
उपविभागीय अधिकारी सर्व यांजकडे जरूर त्या पुढील कार्यवाहीसाठी

पाठविले
दि 22 JUL 2011
आवक/जावक लिपिक

सही/-
अपर जिल्हाधिकारी, रत्नागिरी करिता